# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १७/०६/२०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित केलेल्या २६६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**ठराव क्रमांक : ६७१८** **दिनांक : १९/०५/२०१६**
**१७/०६/२०१६**

गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्रमांक प्रआयो-२०१५/ प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल), शिबीर कार्यालय नागपूर, दिनांक ९/१२/२०१५ नुसार परवडणा-या घरांची निर्मिती व वितरणासाठी उतपन्नाच्या निकषावर पात्रतेसाठी असलेल्या अत्यल्प व अल्प उत्पन्न गटाच्या मर्यादेमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सर्व मंडळांतर्गत बांधण्यात येणा-या सदनिकांच्या वितरणासाठी सध्या असलेल्या ठराव क्रमांक ६६३२ दिनांक ६/०९/२०१३ मधील उत्पन्न मर्यादेत खालीलप्रमाणे वाढ व बदल करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

| अ.क्र. | अत्पन्न गट | सुधारित मासिक उत्पन्न मर्यादा | सुधारित वार्षिक उत्पन्न मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | अत्यल्प | रु. २५,०००/- पर्यंत | रु. ३,००,०००/- पर्यंत |
| २. | अल्प | रु. २५,००१/- ते ५०,०००/- पर्यंत | रु. ३,००,००१/- ते<br>रु. ६,००,०००/- पर्यंत |
| ३. | मध्यम | रु. ५०,००१/- ते रु. ७५,०००/- पर्यंत | रु. ६,००,००१/- ते<br>रु. ९,००,०००/- पर्यंत |
| ४. | उच्च | रु. ७५,००१/- वा त्यापेक्षा जास्त | रु. ९,००,००१/- वा त्यापेक्षा जास्त |

सदरचे आदेश यानंतर दिल्या जाणा-या गाळे विक्रीच्या सर्व जाहिरातींना लागू होतील.

**बाब क्रमांक २६६/२**

**विषय :-** **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाचा लेखा, लेखापरिक्षण अहवालासह प्राधिकरणाच्या बैठकीत अवलोकनार्थ व स्वीकृतीसाठी ठेवण्याबाबत.**

**ठराव क्रमांक : ६७१९** **दिनांक : १७/०६/२०१६**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाचा वित्तीय वर्ष सन २०१४-१५ चा वार्षिक लेखा, लेखापरिक्षण अहवालासह स्वीकृत करण्यात येत आहे.

तसेच वार्षिक लेखा लेखापरिक्षण अहवालासह सॉफ्ट कॉपी Adobe Reader (PDF File) स्कॅनिंग न करता, PDF file मध्ये शक्यतो २० MB किंवा त्यापेक्षा कमी साईजमध्ये तसेच पुस्तक स्वरुपात प्रत्येकी २५ छापील प्रती ( Hard Copy) व २० सी.डी. ( मराठी / इंग्रजी ) मध्ये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे सादर करण्याकरिता शासनाकडे पाठविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २६६/५**

**विषय :-** **मुंबई मंडळाच्या जमिनीचे भाडेपट्टा करारनाम्याचे नुतनीकरण, वाटप केलेल्या भूखंडाच्या योग्य वापरासंबंधी तपासणी व थकीत रकमांच्या वसुलीचे नागरी जमीन कमाल धारणा व इतर प्रकारे मुंबई मंडळासाठी जमीन प्राप्त करुन घेण्यासाठीचे काम सुरळीत व त्वरेने होण्याच्या दृष्टीने ०२तहसिलदार व ०६ नायब तहसिलदारांची नियुक्त करण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७२०** **दिनांक : १७/०६/२०१६**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या जमिनींचे भाडेपट्टा करारनाम्याचे नुतनीकरण, वाटप केलेल्या भूखंडाच्या योग्य वापरा संबंधी तपासणी व थकीत रकमांच्या वसुलीचे नागरी जमीन कमाल धारणा व इतर प्रकारे मुंबई मंडळासाठी जमीनी प्राप्त करुन घेण्यासाठीचे काम सुरळीत व त्वरेने होण्याच्या दृष्टीने मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासाठी ०२ तहसिलदार व ०६ नायब तहसिलदारांची पदे मंजूर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर संबंधित तहसिलदार यांना " उप भूव्यवस्थापक/मुंबई मंडळ ( Dy.Land Manager/Mumbai Board ) " व नायब तहसिलदार याना " सहाय्यक भूव्यवस्थापक/मुंबई मंडळ ( Asstt.Land Manager/Mumbai Board) असे संबोधण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २६६/६**

**विषय :- सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाकरिता सनदी लेखापालांची नेमणूक करणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७२१** **दिनांक : १७/०६/२०१६**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, १) मे.के.एस.संघवी आणि कं., घाटकोपर, मुंबई यांना आयकर विषयक कामासाठी रु.२,०९,०००/- अधिक कर, २) मे.ए.व्ही.शाह आणि कं., कांदिवली, मुंबई यांना मुल्याधारित कर विषयक कामे यासाठी रु.१,१०,०००/- व व्यवसाय कर, लेबर सेस विषयक कामासाठी दरमहा रु.१०,०००/- असे एकुण एकत्रित दरमहा रु.१,२०,०००/- अधिक कर, ३) मे. आर.एस.डी. ॲण्ड असो., बेलापूर, नवी मुंबई यांना एकत्रित वार्षिक फी रु.३,१०,०००/- अधिक कर या दराने दि.०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ वर्षासाठी व सन २०१७-१८ या वर्षासाठी ५% वाढीसह नेमणूकीस मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकरणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.